# कृषि पणन विषयक बातम्या : ऑक्टोंबर 2022

अॅग्रोवन

## कृषी व्यवसाय, मूल्यसाखळीच्या विकासासाठी 'मॅग्नेट'चे पाठबळ

### अकरा पिकांचा समावेश; अर्जासाठी सोमवारपर्यंत मुदत

अॅग्रोवन वृत्तसेवा

**नाशिक :** ''राज्यातील फलोत्पादन पिकांसंबंधित कृषी व्यवसाय व मूल्यसाखळी विकसित करण्यासाठी 'महाराष्ट्र अॅग्रीबिजनेस नेटवर्क' (मॅग्नेट) प्रकल्प आहे. या प्रकल्पात एकूण ११ फलोत्पादन पिकांचा समावेश आहे. त्यात डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, सीताफळ, चिकू, पेरू, स्ट्रॉबेरी, भेंडी, लाल व हिरवी, मिरची व फुलांचा समावेश आहे. हा प्रकल्प २०२६-२७ या कालावधीपर्यंत राबविण्यात येईल. लाभासाठी सोमवारपर्यंत (ता. १०) दुपारी ५ वाजेपर्यंत अर्ज स्वीकारण्यात येतील'', अशी माहिती पणन मंडळाचे नाशिक विभागीय उपसरव्यवस्थापक चंद्रशेखर बारी यांनी दिली.

कृषी व्यवसायांशी निगडित संस्था व शेतकरी उत्पादक संस्थांचे सक्षमीकरण व त्यांची क्षमता बांधणी करण्याचा प्रयत्न आहे. राज्य शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग आणि आशियायी विकास बँक यांनी त्यासाठी अर्थसाह्य केले आहे. शेतकरी उत्पादक संस्था व मूल्यसाखळी गुंतवणूकदार यांच्या सक्षमीकरणसाठी काढणीपश्चात पायाभूत सुविधा उभारणीसाठी वित्तीय अर्थसाह्य व अनुदान उपलब्ध आहे.

लाभार्थींकडून आलेल्या अर्जांचे मूल्यांकन करून त्यातून पहिल्या ६४ लाभार्थींची निवड होईल. त्यांना प्रकल्प अहवालाच्या जास्तीत जास्त ६० टक्क्यांपर्यंत अनुदान मिळेल. सवलतीच्या दराने कर्ज मिळेल. अर्जदारांनी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या www.msamb.com या संकेतस्थळावर नोंदणी करून विहित नमुन्यातील अर्ज, पात्रतेचे निकष व सविस्तर तपशील, मूल्यांकनाचे निकष, कागदपत्रांची यादी आदी माहिती डाउनलोड करावी. छापील अर्ज परिपूर्ण माहितीसह व आवश्यक कागदपत्रे, मूळ अर्जासोबत सहपत्रीत करून दोन प्रतीत प्रकल्प अंमलबजावणी कक्ष मॅग्नेट कार्यालय, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या संबंधित विभागाच्या विभागीय कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे, असे बारी यांनी सांगितले.

#### ...यांना करता येणार अर्ज

शेतकरी उत्पादक संस्था या घटकांतर्गत कंपनी कायदा अथवा सहकारी संस्था कायद्यान्वये नोंदणी झालेली शेतकरी उत्पादक कंपनी, आत्मा कार्यालयामार्फत नोंदणीकृत शेतकरी गट, महाराष्ट्र ग्रामिण जीवन उन्नती अभियानांतर्गत स्थापित प्रभाग संघ, महिला आर्थिक विकास महामंडळांतर्गत स्थापित लोकसंचालित साधन केंद्र तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांचे फेडरेशन, असोसिएशन, मूल्यसाखळी गुंतवणूकदार या घटकांतर्गत शेतकरी उत्पादक संस्था नसलेली मात्र निर्धारित ११ फलोत्पादक पिकांच्या उत्पादकांबरोबर कामकाज करीत असलेले प्रक्रियादार, निर्यातदार, अॅग्रीगेटर, मध्य व मोठी स्वरूपातील विक्री संस्था, अॅग्री स्टार्टअप संस्था यांना अर्ज करता येईल.



Pune, Main
08/10/2022 Page No. 3

# बारामतीत रेशमाचा देशातील पहिला ई-लिलाव

## संगमनेरच्या ५३५ किलो रेशीम कोषाची गुलबर्ग्याच्या व्यापाऱ्याकडून ऑनलाइन खरेदी

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : शेतीमाल खरेदी- विक्रीमधील मध्यस्थांची साखळी कमी करत, थेट ऑनलाइन व्यवहारांसाठी केंद्र सरकारच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय कृषी बाजार (ई-नाम)मध्ये रेशीमचा समावेश करण्यात आला आहे. याचा पहिला ई-लिलाव बारामती (जि. पुणे) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये झाला असून, संगमनेरच्या शेतकऱ्यांचा ५३५ किलो रेशीम कोष थेट गुलबर्गा येथील व्यापाऱ्याने ऑनलाइन खरेदी केला आहे. या माध्यमातून २ लाख ८१ हजार ९९९ रुपयांचा देशातील पहिला रेशीम कोषाचा ई-लिलाव झाला आहे.

बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीने रेशीम शेतीला चालना मिळण्यासाठी रेशीम कोष खरेदी- विक्रीसाठी स्वतंत्र विभाग सुरू केला आहे. यासाठी रेशीम संचालनालयाची मान्यता घेतली असून, ई-नाम योजनेमध्ये बारामतीचा समावेश करण्यात आला आहे. या माध्यमातून मका, सोयाबीन, गूळ, गहू यांचे ऑनलाइन लिलाव केले जातात. मात्र रेशीम कोषाचा समावेश ई-नाममध्ये करण्यासाठी राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांच्या पाठपुराव्यानंतर मुख्यमंत्री आणि पणनमंत्री असलेल्या एकनाथ शिंदे आणि पणन सचिव अनुपकुमार यांनी मान्यता दिली.



### फळे भाजीपाल्यात ई-नाम अपयशी

अनेक बाजार समित्यांमध्ये ई-नाम अपयशी ठरल्याचे वास्तव आहे. अनेक सहभागी बाजार समित्या लिलाव झाल्यानंतर त्यांची नोंद ई-नाम पोर्टलवर करून, ऑनलाइन लिलाव झाल्याचे दर्शवितात. बहुतेक सर्वच समित्या केंद्र सरकारची दिशाभूल करत असल्याचे वास्तव आहे.

### ११८ बाजार समित्यांमध्ये ई-नाम

११८ बाजार समित्यांमधून ४१९ लाख क्विंटल शेतीमालाची ई-लिलावाद्वारे खरेदी-विक्री झाली असून, मूल्य ९ हजार ८६९ कोटी असल्याचा दावा पणन मंडळाने केला.

**मी आणि आमच्या परिसरातील चार शेतकऱ्यांची ५३५ किलो रेशीम कोष बारामती येथे विक्रीस आणली होती. या वेळी ऑनलाइन लिलावात १२ ते १५ व्यापाऱ्यांनी बोली लावली. बोली ३०० रुपयांपासून सुरू होऊन, ५८० ला सर्वाधिक बोली लागली. माझ्या १९७ किलोलाच्या विक्रीत प्रति किलोला ५२० रुपये दर मिळाला. आणि दोन तासांत ऑनलाइन पैसे खात्यावर जमा झाले.**

– **बाळासाहेब घुले,** शेतकरी, रा. चिंचपूर, ता. संगमनेर

Pune, Main
08/10/2022 Page No. 2

पुढारी

# बारामतीत रेशीम कोषाची ई-ट्रेडद्वारे यशस्वी विक्री

## बारामती बाजार समितीत ई-नामअंतर्गत व्यापार; पणन संचालक सुनील पवार यांची माहिती

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीने नागपूर येथील रेशीम संचालनालयाच्या मान्यतेने मुख्य बाजारात रेशीम कोष खरेदी-विक्रीसाठी केंद्र सुरू केले आहे. समितीने सुरू केलेल्या या केंद्रामध्ये मंगळवारी (दि. ४) रेशीम कोषाचा देशातील पहिला ई-लिलाव 'ई-नाम'अंतर्गत यशस्वीपणे पार पडल्याची माहिती पणन संचालक सुनील पवार यांनी दिली.

याकामी रेशीम कोष या शेतमालाचा ई- नाममध्ये समावेश झाल्यास मोठी बाजारपेठ उपलब्ध होईल. ही बाब विचारात घेऊन महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि पणन संचालनालयाच्या पुढाकाराने केंद्र सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत होता. तसेच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सहकार व पणनचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार यांच्या पुढाकाराने अखेर रेशीम कोष या शेतमालाचा ई-नाममध्ये समावेश करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. रेशीम कोषच्या पहिल्या ई-लिलावामध्ये गुलबर्गा (कर्नाटक) येथील खरेदीदाराने ई-नामद्वारे भाग घेऊन मालाची खरेदी केली आहे. तसेच अहमदनगर जिल्ह्यातील चिंचपूर (ता. संगमनेर) येथील शेतकऱ्यांनी रेशीम कोषाची विक्री केली आहे. एकूण ५३५ किलो इतक्या रेशीम कोषाची ई-लिलावाद्वारे विक्री झाली. त्याची किंमत २ लाख ८१ हजार ९९९ रुपये इतकी आहे. खरेदीदाराने ई-नामद्वारे शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये २ लाख ७९ हजार ६९ इतकी रक्कम ऑनलाइन दिली आहे.

बारामती बाजार समितीच्या केंद्रामध्ये पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, उस्मानाबाद, अहमदनगर, बीड, परभणी, यवतमाळ येथून शेतकरी रेशीम कोष विक्रीसाठी आणतात. रेशीम कोषाची विक्री उघड लिलावाद्वारे केली जाते. या लिलावामध्ये भाग घेऊन कलकत्ता व कर्नाटक येथील खरेदीदार रेशीम कोषाची खरेदी करतात. ई-नाममध्ये सहभागी होऊन रेशीम कोषाची विक्री केल्यानंतर शेतकऱ्यांना धनादेशाद्वारे रक्कम दिली जात होती. त्याऐवजी आता ऑनलाइनद्वारे रक्कम जमा करण्यात येत आहे.

बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीचा ई-नाममध्ये समावेश झाला असून मका, सोयाबीन, गहू व गूळ या शेतमालाची ई-नामअंतर्गत ई-लिलावाद्वारे विक्री सुरू झाली आहे. रेशीम कोष खरेदी- विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणावर इतर जिल्ह्यातील शेतकरी व इतर राज्यातील खरेदीदार भाग घेतात. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला फायदा होण्याची अपेक्षा असल्याचेही पवार यांनी सांगितले.



**बारामती येथे रेशीम कोषाचा देशातील पहिला ई-लिलाव होऊन शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर ऑनलाइनवर रक्कम जमा करण्यात आली आहे.**

My Gramin Edition
Oct 7, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

Agrowon Dt. 05/10/2022

# भारत बेदाणा उत्पादनात पाचव्या, निर्यातीत दहाव्या स्थानी कायम

## टर्की, अमेरिका, इराण आणि चीनशी स्पर्धा; निर्यात तीन टक्क्यांवरच



सुदर्शन सुतार : ॲग्रोवन वृत्तसेवा

सोलापूर : जगभरातील बेदाणा उत्पादक देशात भारताचे स्थान पाचव्या स्थानावर असूनही, निर्यातीत मात्र भारत तब्बल दहाव्या स्थानावर आहे. उत्पादनामध्ये प्रामुख्याने टर्की, अमेरिका, इराण आणि चीनशी भारताची स्पर्धा आहे. गेल्या पाच वर्षांत भारताने उत्पादनातील आपले स्थान पहिल्या पाचमध्ये कायम ठेवले आहे. पण निर्यातीतील दहावे स्थान मात्र काही केल्या पुढे सरकलेले नाही. दरवर्षी अवघ्या तीन टक्क्यांपर्यंतच बेदाण्याची निर्यात होते आहे. पान ४ वर »

### निर्यातीचा वाटा तीन टक्के

गेल्या पाच वर्षांतील निर्यातीची तुलना करता दरवर्षी टर्कीने सरासरी २ लाख ६० हजार ७७४ टन निर्यात करत निर्यातीत सर्वाधिक ३२ टक्के वाटा मिळवला आहे. त्यानंतर अमेरिकेने ७० हजार ६४२ टन निर्यात करत ११ टक्के, इराणने ७० हजार ६४२ टन निर्यात करत नऊ टक्क्यांपर्यंत, उझबेकिस्ताननेे ६६ हजार ९६२ टन निर्यात करत आठ टक्के, चिलीने ५४ हजार ७८५ टन निर्यात करत ७ टक्के वाटा मिळवला आहे. तर दक्षिण आफ्रिका सात टक्के, अफगाणिस्तान पाच टक्के, अर्जेंटिना, चीनने चार टक्के आणि त्या पाठोपाठ भारताने २५ हजार ८८३ टन निर्यात करत अवघ्या तीन टक्क्यापर्यंतचा वाटा मिळवला आहे.

“ सध्या बेदाण्याच्या खरेदीचा हंगाम अंतिम टप्प्यात आहे. दरात फारसा चढ-उतार नाही, दर स्थिर आहेत. निर्यातीच्या तुलनेत देशांतर्गत बाजारातच दरवर्षी चांगला उठाव मिळतो, त्यामुळे निर्यातीसाठी फारसा बेदाणा जात नाही. यंदाही तीच परिस्थिती राहील, असे वाटते.

**- सचिन भोसले-गवळी,**
**बेदाणा उत्पादक व निर्यातदार, सोलापूर**

## भारत बेदाणा उत्पादनात पाचव्या, निर्यातीत दहाव्या स्थानी कायम

» पान १ वरून

बेदाणा उत्पादन घेणाऱ्या प्रमुख देशांमध्ये भारतासह टर्की, अमेरिका, इराण, चीन, दक्षिण आफ्रिका, उझबेकिस्तान, चिली, अर्जेंटिना या देशांचा समावेश होतो. यामध्ये भारत पाचव्या स्थानावर आहे. दरवर्षी जगभरात १३ लाख टनांहून अधिक बेदाणा उत्पादन होते. विशेष म्हणजे जगभरात होणाऱ्या बेदाण्याच्या तुलनेत भारतीय बेदाणा गुणवत्ता आणि दर्जाच्या बाबतीत उत्कृष्ट आहे. बाजारात मोठी संधी भारतीय बेदाण्याला मिळू शकते. पण निर्यातीतील घसरत्या टक्क्यांच्या कारणाचा शोध घेणे गरजेचे आहे. गेल्या पाच वर्षात दोन लाख ९० हजार टनापर्यंतचे उत्पादन घेत टर्की हा कायम पहिल्या स्थानावर राहिला आहे. त्यानंतर अमेरिका दोन लाख नऊ हजार टन उत्पादन घेत दुसऱ्या स्थानावर, इराण एक लाख ७३ हजार टन, चीन १ लाख ७२ हजार टन उत्पादन घेत अनुक्रमे तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकावर आहे, तर भारत एक लाख ४५ हजार टनापर्यंतचे उत्पादन घेत पाचव्या स्थानावर आहे.

### ...म्हणून निर्यातीत पिछाडी

देशांतर्गत बाजारातील दर आणि निर्यातीतील दरात फारशी तफावत नसल्याने निर्यातीपेक्षाही देशांतर्गत बाजारातच अधिक चांगले दर मिळत असल्याने निर्यातदार निर्यातीसाठी फारशी उत्सुकता दाखवत नसल्याचे सांगण्यात येते. सध्या देशांतर्गत बाजारात पहिल्या प्रतीच्या बेदाण्याला प्रतिकिलो १७५ ते २२० रुपये, दुसऱ्या प्रतीच्या बेदाण्याला १४० ते १६० रुपये आणि तिसऱ्या प्रतीच्या बेदाण्याला ६० ते ८० रुपये असा दर आहे. सध्या दिवाळीच्या तोंडावर बेदाण्याची खरेदी जोरात सुरू आहे. या महिनाअखेरपर्यंत खरेदीचा हंगाम चालतो. सध्या देशांतर्गत बाजारातील हेच दर सर्वाधिक मागणी असणाऱ्या आखाती देशातही आहेत. शिवाय पहिल्या प्रतिपेक्षाही तिसऱ्या प्रतीच्या बेदाण्याला तिथे अधिक पसंती दाखवली जाते, तर भारतात तिसऱ्या प्रतीच्या बेदाण्यालाही चांगला दर मिळतो, साहजिकच, निर्यातीसाठी बेदाणा मिळत नाही, ही काही कारणे निर्यातीच्या अडसरीमागे सांगितली जातात.

सकाळ TODAY Dt. 03/10/2022 | पुणे, सोम

## मार्केट यार्ड : शेतकरी, व्यापारी आणि ग्राहकांसाठी उपक्रम

# बाजार समितीतर्फे फूल महोत्सव

**पुणे, ता. २ :** दसरा सणानिमित्ताने पुणे शहरातील आणि उपनगरातील नागरिकांना एकच ठिकाणी सर्व प्रकारची फुले मिळावी, तसेच शेतकरी, व्यापारी आणि ग्राहकांना फुले खरेदी विक्रीसाठी सुलभ सेवा मिळावी, यासाठी बाजार समितीच्या वतीने यंदा मार्केट यार्डात सोमवार (ता. ३) ते बुधवार (ता. ५) फूल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

यंदा शिवनेरी रस्त्यावरील फुलांच्या विक्रीला बंदी घालण्यात आली आहे. यासाठी ट्रक पार्किंग दोन दिवस बंद ठेऊन त्याठिकाणी फुलांची विक्रीची सोय केली आहे. यामुळे शिवनेरी रस्त्यावरील वाहतूक कोंडी टाळून शेतकरी आणि ग्राहकांना वाहतूक सोपी होणार असल्याची माहिती प्रशासक मधुकांत गरड यांनी दिली.



### अशी आहे स्थिती

- यंदा पाऊस लांबल्याने आणि अवकाळी सदृश सततच्या पावसाने फुलांचे मोठे नुकसान
- नवरात्रीत बाजारात भिजलेल्या आणि निकृष्ट फुलांची आवक
- चांगल्या फुलांना मागणी आणि दर चांगले
- दसऱ्यानिमित्त झेंडू, गुलछडी आणि शेवंतीला मागणी
- नवरात्रीत मागणी वाढल्याने दरदेखील वाढले

**फूल उत्पादक शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या सणांपैकी एक असलेल्या नवरात्र आणि दसऱ्यानिमित्त विविध फुलांना मागणी वाढली आहे. यामुळे पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमधील फूल बाजार फुलला आहे. रविवारी (ता. २) झेंडूला प्रति किलोला २० ते १००, शेवंतीला १०० ते २५० तर गुलछडीला २५० ते ४०० रुपयांपर्यंत भाव होता.**
**- सागर भोसले,** फुलांचे अडतदार

**दसरा सणानिमित्त झेंडू, शेवंती आणि गुलछडीची मागणी वाढली आहे. ही मागणी पुढील दोन दिवस मंगळवारपर्यंत (ता. ४) कायम असणार आहे. यामुळे आता राज्याच्या विविध जिल्ह्यांमधून फुलांची आवक आणि मागणी वाढण्यास सुरुवात झाली आहे.**
**- अरुण वीर,** अध्यक्ष, फूल बाजार अडते असोसिएशन

**ट्रक पार्किंगच्या जागेत व्यापाऱ्यांच्या एका वाहनासाठी एका दिवसांसाठी एक हजार रुपये शुल्क आकारला जाईल. तर शेतकऱ्यांना कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही; मात्र शेतकऱ्यांना फुले विक्रीसाठी नोंदणीकृत सात बारा उतारा, आधार कार्ड बंधनकारक असणार आहे.**
**- मधुकांत गरड,** प्रशासक, कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे